डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन
व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे.
(महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था)
barti
२८ क्वीन्स् गार्डन, जुन्या सर्किट हाऊसजवळ, पुणे-४११ ००१. दूरध्वनी क्र. : ०२०-२६३४ ३६००/२६३३ ३३३०
● E-mail : directorbarti@gmail.com ● Website : https://barti.maharashtra.gov.in ● फॅक्स :०२०-२६३३ ३५९६

जा.क्र. बार्टी/पुणे/ शिष्यवृत्ती/४४४९/२०१४-१५ दिनांक०९/०३/२०१५

... राज्य परीक्षा परिषद
पुणे
दि. 09 MAR 2015
आवक क्र. 4073

प्रति,

मा. आयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे – १.

**विषय : डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय प्रज्ञाशोध शिष्यवृत्ती [(Dr. Babasaheb Ambedkar National Talent Search Scholarship (BANTS)] पात्र विद्यार्थ्यांच्या याद्या मिळणेबाबत.**

**संदर्भ : आपले पत्र क्र. मरापप/NTS/२०१५/स-३/१६१३, दिनांक १८/०२/२०१५.**

संदर्भिय पत्रान्वये आपण कळविलेलया माहितीबावत आम्ही आभारी आहोत.

आपल्याला माहितच आहे की, इयत्ता १० वी साठी प्रज्ञावान विद्यार्थ्यांचा शोध घेण्यासाठी राष्ट्रीय प्रज्ञाशोध परीक्षा [National Talent Search Examination-(NTS)] या परीक्षेचे आयोजन NCERT, नवी दिल्ली यांचे मार्फत करण्यात येते. या परीक्षेमध्ये यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांना त्यांच्या पी.एच.डी. शिक्षणापर्यंत वेगवेगळे दराने ही शिष्यवृत्ती देण्यात येते. या परीक्षेचे आयोजन राज्यस्तर व राष्ट्रीय स्तर असे दोन स्तरांवर करण्यात येते.

**अ) राज्यस्तर परीक्षा –** या परीक्षेचे आयोजन संबंधीत राज्यांच्या शिक्षण विभागामार्फत करण्यात येते. प्रत्येक राज्यासाठी NCERT ने ठरवून दिलेल्या विद्यार्थी संख्येइतके विद्यार्थी संबंधित राज्याने निवडावयाचे असतात. सदर विद्यार्थी निवडताना खुला, अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती संवर्ग विचारात घेतले जातात. अनुसूचित जाती संवर्गातून १५% आणि अनुसूचित जमाती संवर्गातून ७.५% विद्यार्थ्यांची निवड केली जाते. तसेच प्रत्येक संवर्गामध्ये ३% अपंग आरक्षण समाविष्ट होते. प्रत्येक संवर्गातील विद्यार्थ्यांची यादी करताना समान गुण प्राप्त केलेल्या सर्व विद्यार्थ्यांचा समावेश करण्यात येतो.

Urgent
7/3/2015

**ब) राष्ट्रीयस्तर परीक्षा** — सर्व राज्यामधून निवडलेल्या विद्यार्थ्यांचे परीक्षा NCERT, नवी दिल्ली यांचे कडून घेण्यात येते. त्यामधून १००० विद्यार्थ्यांची निवड या राष्ट्रीय स्तरावरच्या शिष्यवृत्तीसाठी करण्यात येते. महाराष्ट्रातून यात १००० विद्यार्थ्यांपैकी सर्वसाधारणपणे २००च्या आसपास विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या प्राप्त होतात. राज्यस्तर परीक्षेतून राष्ट्रीय स्तर परीक्षेसाठी निवडले गेलेले विद्यार्थी हे महाराष्ट्रातील सुमारे ८०,००० विद्यार्थ्यांतून निवडलेले असतात. त्यामुळे त्या निवडलेल्या सर्व विद्यार्थ्यांची गुणवत्ता निश्चितच चांगली असते. या विद्यार्थ्यांपैकी जे अनुसूचित जातीचे विद्यार्थी राष्ट्रीय स्तरावरील शिष्यवृत्तीसाठी परीक्षेस बसतात. परंतु काहींचे शिष्यवृत्तीसाठी निवड होते व काहींची निवड होत नाही.

२. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे दिवसाच्या २४ तासापैकी १८ ते २० तास अतुलनीय अभ्यास करण्याची प्रवृत्ती, चिकाटीपणा, कठोर परिश्रम , राष्ट्रप्रेम, नैतिकता या सर्व गुणांची प्रेरणा घेऊन या परीक्षेची जोरदार तयारी करावी, यासाठी NCERT नवी दिल्ली द्वारे घेतल्या जाणाऱ्या सदर राष्ट्रीय प्रज्ञा शोध परीक्षा [(National Talent Search Examination)-(NTSE)] मध्ये राष्ट्रीय स्तरावरील परीक्षेत बसून परीक्षा दिलेल्या परंतु NTS Scholarship (शिष्यवृत्ती) साठी पात्र न ठरलेल्या महाराष्ट्र राज्याचे अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना डॉ. बाबसाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, (बार्टी) पुणे मार्फत शिष्यवृत्ती देणेसाठीचा निर्णय घेतला आहे. **राष्ट्रीय स्तरावरील सदर NTSE परीक्षेला बसलेले परंतु 'NTS Scholarship' या शिष्यवृत्तीसाठी निवड न झालेल्या महाराष्ट्र राज्याचे अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना National Talent Search Scheme मधील तरतुदीनुसार सदर NTS Scholarship च्या रकमेच्या ८०% रक्कम डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे कडून डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय प्रज्ञाशोध शिष्यवृत्ती [Dr. Babasaheb Ambedkar National Talent Search Scholarship —(BANTS] च्या नावाने शिष्यवृत्ती म्हणून देण्यात येणार आहे.** तसेच NCERT द्वारे घेतल्या जाणाऱ्या सदर NTSE या राष्ट्रीय प्रज्ञाशोध परिक्षेसाठी भविष्यात NTS शिष्यवृत्तीमध्ये दर वाढ झालीतर त्या वाढीव दराने देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्तीच्या ८०% रक्कम बार्टी, पुणेकडून डॉ. **बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय प्रज्ञाशोध शिष्यवृत्ती [Dr. Babasaheb Ambedkar National Talent Search Scholarship — (BANTS)]** च्या नावाने देण्यात येईल.

तरी वर नमूद केल्यानुसार बार्टी, पुणे मार्फत **डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय प्रज्ञाशोध शिष्यवृत्ती [Dr. Babasaheb Ambedkar National Talent Search Scholarship – (BANTS)]** देण्यासाठी कृपया खालीलप्रमाणे कार्यवाही होण्यासाठी विनंती आहे.

१) संबंधित विद्यार्थ्यांची यादी, शाळेचे नाव, त्यांचे पत्ते व इतर तपशील बार्टीला उपलब्ध करुन द्यावे ही, विनंती.

२) बार्टी, पुणे या संस्थेच्या वरील अत्यंत महत्वाच्या आणि सर्व विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देणाऱ्या सदर कार्यक्रमाची माहिती सर्व संबंधित शाळा व विद्यार्थी यांना देण्यात यावी, ही विनंती.

३) National Talent Search Scheme (NTSS) या योजनांसाठी राष्ट्रीय स्तरावर होणाऱ्या परिक्षांमध्ये अनुसूचित जातीच्या सर्व विद्यार्थ्यांना चांगले यश मिळविण्यासाठी सर्व संबंधित शाळांनी अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना चांगले मार्गदर्शन करावे व त्यांना प्रोत्साहन द्यावे, यासाठी आपल्या माध्यमातून सूचित करावे ही, विनंती.

४) NTS योजनांतर्गत राज्य स्तरावर झालेल्या परिक्षांमधून निवडलेल्या व राष्ट्रीयस्तर परीक्षासाठी पात्र ठरलेल्या महाराष्ट्राच्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांची यादी लवकरात लवकर बार्टी या संस्थेकडे पाठवावी ही, विनंती. जेणेकरुन बार्टी या संस्थेकडूनही सरळ सर्व विद्यार्थ्यांना संबोधित करता येईल.

या कार्यालयाची माहितीनुसार सन २०१४-१५ वर्षाची National Talent Search Examination (NTSE) ची राज्यस्तरीय परीक्षा संपन्न झाली असून पुढच्या काही महिन्यात राष्ट्रीय स्तरावरची परीक्षा होणार आहे. सबब, सदर राष्ट्रीय स्तरावरची परीक्षासाठी निवड झालेल्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना वेळेतच वरील बाबी कळविणे आवश्यक असल्याने लवकरात लवकर आपल्यामार्फत कळविण्यात यावे व सविस्तर माहिती या कार्यालयास उपलब्ध करुन देण्यास विनंती आहे.

३. विद्यार्थ्यांच्या मनावर चांगले संस्कार व्हावेत आणी भविष्यात निकोप व सुदृढ आणि स्वच्छ मनाची पिढी तयार होवुन वैयक्तीक प्रगतीबरोबरच समाजाची व पर्यायाने बलशाली प्रगत राष्ट्राची निर्मीती व्हावी या उद्देशाने समता, सामाजिक न्याय ; बंधुत्व; जात पातीचे निमुर्लन; नैतिकता आणी नैतिक मुल्यांची जपणुक; सहिष्णुता व राष्ट्रीय एकता आणि एकात्मता; राष्ट्रप्रेम; सांप्रदायिक सद्भावना व

सहिष्णुता, इत्यादी भावना व गुण विद्यार्थ्यांच्या अंतर्मनात वृध्दीगत होवुन भविष्यात समाजात या सर्व महत्वाच्या बाबींविषयी पोषक वातावरणाची निर्मीती व्हावे व राज्यघटनेमध्ये असलेल्या या मुलभुत तत्वांच्या अंमलबजावणीस हातभार लावता यावेत यासाठी माध्यमिक व विद्यालय स्तरापर्यंतच्या अनुसूचीत जातीच्या मेहनती व गुणवत्ता धारक विद्यार्थ्यासाठी पुरस्काराच्या माध्यमाने विशेष प्रोत्साहन देण्यासाठी या अत्यंत महत्वाच्या उपक्रमाला आपल्या कडून मिळत असलेल्या सहकार्याबाबत आपले मनापासुन आभार.

महासंचालक<br>
डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन<br>
व प्रशिक्षण संस्था, पुणे